भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# भविष्य निधी अधिनियम, १९२५

**(१९२५ चा अधिनियम क्रमांक १९)**

[२८ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Provident Funds Act, 1925

**(Act No. 19 of 1925)**

[As in force on the 28th February 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी

भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९६

[किंमत : रु. ] रु. ५.००

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट, १९२५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक १, दिनांक २३ नोव्हेंबर १९९५ यात पृष्ठे ७८ ते ८९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २३ नोव्हेंबर १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Provident Fund Act, 1995 as on the 28th February 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the **Gazette of India** Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 6, dated 23rd November 1995 on pages 78 to 89.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 23rd November 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# भविष्य निधि अधिनियम, १९२५

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९२५ (१९२५ चा २८).
२. भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९२७ (१९२७ चा ७).
३. निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२).
४. भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९२९ (१९३० चा १).
५. भारत शासन (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७.
६. निरसन व विशोधन अधिनियम, १९४२ (१९४२ चा २५).
७. भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९४६ (१९४६ चा ११).
८. भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम व अध्यादेश यांचे अनुकूलन) आदेश, १९४८.
९. विधि अनुकूलन आदेश, १९५०.
१०. निरसन व विशोधन अधिनियम, १९५० (१९५० चा ३५).
११. भाग ख राज्ये (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).
१२. भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा ४६).

# भविष्य निधि अधिनियम, १९२५

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. सक्तीच्या ठेवींना संरक्षण.

४. परतफेड करण्याबाबत उपबंध.

५. नामनिर्देशित व्यक्तींचे हक्क.

६. वजाती करण्याचा अधिकार.

६क. केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतरच्या दोन वर्षांच्या आत पूर्वपरवानगी-शिवाय वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारल्यास त्यांच्या बाबतीत शासकीय अंशदाने रोखून धरणे किंवा त्यांची वसुली करणे.

७. सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण.

८. इतर भविष्य निधींना ह्या अधिनियम लागू करण्याचा अधिकार.

९. सैनिकांच्या इस्टेटींची व्यावृत्ती.

१०. [निरसने]

अनुसूची

शब्दसूची :– इंग्रजी–मराठी
मराठी–इंग्रजी

# भविष्य निधि अधिनियम, १९२५

**(सन १९२५ चा अधिनियम क्रमांक १९)**[1]

(२८, फेब्रुवारी, १९९५ रोजी यथा विद्यमान)

[२७ ऑगस्ट, १९२५]

**शासकीय व इतर भविष्य निधी यांच्याशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करण्यासाठी व तो एकत्रित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** शासकीय व इतर भविष्य निधी यांच्याशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करणे व तो एकत्रित करणे समयोचित आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास "भविष्य निधि अधिनियम, १९२५" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार [2]**** [3][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतावर राहील.

(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमून देईल त्या[4] दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— व्याख्या.

(क) "सक्तीची ठेव" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखाद्या भविष्य निधीत दिलेल्या ज्या वर्गणीची रक्कम, किंवा त्यात ठेवलेल्या ज्या ठेवीची रक्कम, एखाद्या आयुर्विमा पत्राच्या संबंधातील विम्याचे हप्ते भरण्याचे [5][किंवा एखाद्या कुटुंब वेतन निधीच्या संबंधातील वर्गणी किंवा हप्ते भरण्याचे] प्रयोजन खेरीजकरून अन्यथा, त्या भविष्य निधीच्या नियमांनुसार, एखादी विनिर्दिष्ट घटना घडेपर्यंत, मागणी प्रदेय-नसते अशा वर्गणीची किंवा ठेवीची रक्कम, असा असून, त्या शब्दप्रयोगात, [6]*** कोणतीही अंशदानाची रक्कम व अशा कोणत्याही वर्गणीवर, ठेवीवर किंवा अंशदानावर त्या निधीच्या नियमांनुसार प्रोद्भूत झालेल्या व्याजाची किंवा वाढीची रक्कम यांचा, तसेच, अशी कोणतीही घटना घडल्यानंतर वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती शिल्लक म्हणून जमा असलेल्या वर्गणीच्या, ठेवीच्या, अंशदानाच्या, व्याजाच्या किंवा वाढीच्या कोणत्याही रकमेचासुद्धा समावेश होतो ;

(ख) "अंशदान" या शब्दाचा अर्थ, [7][एखाद्या भविष्य निधीचे कामकाज चालविणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने] [8][त्या निधीत देण्यात येणाऱ्या वर्गणीत, किंवा त्या निधीतील व्यक्तिगत खात्यामध्ये जमा असलेल्या ठेवीत किंवा शिल्लक रकमेत आणखी भर म्हणून] अशा निधीत जमा केलेली कोणतीही रक्कम, असा आहे ; आणि "अंशदायी भविष्य निधि" या शब्दाचा अर्थ ज्या भविष्य निधीच्या नियमांमध्ये अशा अंशदानाच्या रकमा जमा करण्याबाबत उपबंध केलेले आहेत असा एखादा भविष्य निधी, असा आहे ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरता पहा, भारताचे राजपत्र, १९२४, भाग पाचवा, पृष्ठ १२२, सन १९३६ चा विनियम ४ याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे हा अधिनियम खोंडमाळ जिल्ह्यात तसेच १९३६ चा विनियम ५, कलम ३ व अनुसूची एक द्वारे अंगुल जिल्ह्यात अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे. तसेच मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम (१९४१ चा ४) द्वारे विशेषतः वऱ्हाडपर्यंत त्याचा विस्तार करण्यात आला आहे. १९५३ चा उत्तर प्रदेश अधिनियम क्रमांक १९ द्वारे उत्तर प्रदेशात अंशतः तो विशोधित करण्यात आला आहे.

१९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूचीद्वारे या अधिनियमाचा गोवा, दमण व दीव येथे आणि १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची एक द्वारे पांडिचेरीपर्यंत विस्तार करण्यात आला आहे. (दिनांक १ ऑक्टोबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. "ब्रिटिश बलुचिस्तानसह" हा मजकूर अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे वगळण्यात आला.

३. "भाग ख राज्ये वगळता" या मजकुराऐवजी हा मजकूर १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे दाखल करण्यात आला.

४. १ एप्रिल १९२६—भारताचे राजपत्र, १९२५ भाग एक, पृष्ठ ११८२.

५. १९३० चा अधिनियम १, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

६. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, "अशा कोणत्याही वर्गणीच्या किंवा ठेवीच्या संबंधात जमा केलेली" हा मजकूर वगळण्यात आला.

७. "एखाद्या निधी स्थापन करणाऱ्या प्राधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९२५ चा अधिनियम २८, कलम २ द्वारे दाखल करण्यात आला.

८. सन १९३० चा अधिनियम १, कलम २ द्वारे "त्या निधीत देण्यात येणाऱ्या वर्गणीत, किंवा ....." या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "किंवा अन्यथा त्या निधीत देण्यात येणाऱ्या वर्गणीच्या किंवा ठेवीच्या संबंधात" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी "त्या निधीत देण्यात येणाऱ्या वर्गणीत, किंवा ....." या शब्दांनी सुरू होणारा व "आणखी भर म्हणून" या शब्दांनी संपणारा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) "अवलंबित" या शब्दाचा अर्थ, एखाद्या भविष्य निधीच्या मयत वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या पुढील नातेवाईकांपैकी कोणताही नातेवाईक, म्हणजे पत्नी, पती, आई-वडील, मूल, अज्ञान भाऊ, अविवाहित बहीण, आणि त्याच्या मयत मुलाची विधवा पत्नी व मूल, आणि अशा वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या आई-वडीलांपैकी कोणीही हयात नसेल तर, त्याच्या वडिलांचे आई-वडील यांपैकी कोणताही नातेवाईक, असा आहे ;

(घ) "शासकीय भविष्य निधी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, [1][सेक्रेटरी ऑफ स्टेट, केंद्र सरकार, राज्यप्रतिनिधी (क्राऊन रिप्रेझेन्टेटिव्ह) किंवा कोणतेही राज्य शासन यांच्या, ]प्राधिकाराने, [2][शासनाच्या सेवेत असलेल्या] किंवा [3][शैक्षणिक संस्थांमध्ये नोकरीस असलेल्या किंवा केवळ शैक्षणिक प्रयोजनांकरिताच अस्तित्वात असणाऱ्या संस्थांमध्ये कामावर लावलेल्या] कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या व्यक्तींसाठी प्रस्थापित केलेला, रेल्वे भविष्य निधी खेरीजकरून इतर कोणताही भविष्य निधी असा आहे. [4][आणि या अधिनियमात शासनासंबंधी केलेल्या उल्लेखांचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल];

(ङ) "भविष्य निधी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या निधीत कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या कर्मचाऱ्यांकडून वर्गण्या किंवा ठेवी स्वीकारल्या जातात व त्या अशा कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत खात्यांवर धारण केल्या जातात, असा एखादा निधी असा असून, त्या शब्दप्रयोगात [5]*** कोणत्याही अंशदानाच्या रकमा आणि अशा वर्गण्यांच्या, ठेवींच्या, किंवा अंशदानांच्या रकमांवर प्रोद्भूत होणाऱ्या व्याजाची किंवा वाढीची रक्कम यांचा समावेश होतो ;

[6][(च) "रेल्वे प्रशासन" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(एक) [7][युनायटेड किंग्डमच्या] संसदेचा एखादा विशेष अधिनियम किंवा एखादा भारतीय कायदा या अन्वये किंवा शासनाशी केलेल्या एखाद्या संविदे अन्वय [8][भारताच्या कोणत्याही भागात] एखाद्या रेल्वेचे किंवा ट्रामवेचे कामकाज चालविणारी कोणतीही कंपनी ; किंवा

(दोन) [9][केंद्र सरकार] कडून किंवा एखाद्या राज्य शासनाकडून कामकाज चालविण्यात येत असलेल्या अशा कोणत्याही रेल्वेचा किंवा ट्रामवेचा व्यवस्थापक,—

असा आहे; आणि त्यात, पोटकलम (दोन) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही बाबतीत, [1][प्रकरणपरत्वे, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांचा समावेश होतो];

(छ) "रेल्वे भविष्य निधी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखाद्या रेल्वे प्रशासनातील कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या कर्मचाऱ्यांकरिता अशा प्रशासनाच्या प्राधिकाराने प्रस्थापित करण्यात आलेला एखादा भविष्य निधी असा आहे.

सक्तीच्या ठेवींचा संरक्षण.

३. (१) कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य निधीतील सक्तीच्या ठेवीची रक्कम ही कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा भारित करता येणार नाही, आणि अशी रक्कम वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने ओढवलेल्या कोणत्याही ऋणाच्या किंवा कोणत्याही दायित्वाच्या संबंधातील कोणत्याही दिवाणी, महसुली किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही हुकुमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये जप्त होण्यास पात्र ठरणार नाही, आणि कोणत्याही पदीय अभिहस्तांकितीस किंवा "प्रांतीय नादारी अधिनियम, १९२०" अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही प्रापकास अशा कोणत्याही सक्तीच्या ठेवीवर कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही किंवा दावा सांगता येणार नाही. १९२० चा ५.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "शासनाच्या" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९४२ चा अधिनियम २५, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे "त्याच्या कर्मचाऱ्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९२७ चा अधिनियम ७, कलम २ द्वारे "शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांकरिता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. १९३० चा अधिनियम ९, कलम २ द्वारे "अशा वर्गण्यांच्या किंवा ठेवींच्या संबंधात जमा केलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला.

६. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ खंड (च) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

७. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे "भाग क राज्यात किंवा भाग ग राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे, "संघीय रेल्वे प्राधिकरण" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशा कोणत्याही निधीतील कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती त्याच्या मृत्यूच्या वेळी जी रक्कम जमा असेल आणि जी अशा निधीच्या नियमान्वये त्या वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या कोणत्याही अवलंबितास, किंवा त्याच्या वतीने अशा रकमेचे प्रदान घेण्यास कायद्याद्वारे प्राधिकृत करण्यात येईल त्या व्यक्तीस प्रदेय असेल, अशी कोणतीही रक्कम अशा अवलंबिताकडे निहित होईल; मात्र, त्या रकमेतून या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही वजाती करण्यात येतील, आणि अशी अवलंबित व्यक्ती ही वर्गणीदाराची किंवा ठेवीदाराची विधवा पत्नी किंवा त्याचे मूल म्हणून असेल तर ती बाब खेरीजकरून अन्य बाबतीत, या अधिनियमाच्या सुरुवातीच्या अगोदर करण्यात आलेल्या अभिहस्तांकनान्वये अभिहस्तांकितीस असलेल्या हक्कांनादेखील ती रक्कम अधीन राहील, आणि उपरोक्त गोष्टींच्या अधीनतेने, अशी रक्कम ही मयत व्यक्तीवर आलेल्या ऋणापासून किंवा अन्य दायित्वापासून किंवा अशा वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्यूपूर्वी अवलंबित व्यक्तीवर आलेल्या ऋणापासून किंवा अन्य दायित्वापासून मुक्त राहील.

परतफेड करण्याबाबत उपबंध.

४. (१) कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य निधीच्या नियमान्वये, कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम, किंवा अशा रकमेतून या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेली वजात केल्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम जेव्हा प्रदेय झाली असेल तेव्हा, अशी रक्कम देणे ज्याचे कर्तव्य आहे असा अधिकारी ती रक्कम किंवा, प्रकरणपरत्वे, अशी शिल्लक रक्कम अशा वर्गणीदारास किंवा ठेवीदारास देईल, किंवा, तो मरण पावला असेल, आणि---

(क) अशी रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा कोणताही भाग कलम ३ च्या उपबंधान्वये अवलंबिताकडे निहित झाला असेल तर त्या बाबतीत, असा अधिकारी ती रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा भाग त्या अवलंबितास किंवा त्या रकमेचे प्रदान त्याच्या वतीने मिळण्यास कायद्याद्वारे प्राधिकृत करण्यात येईल त्या व्यक्तीस देईल; अथवा

(ख) अशी संपूर्ण रक्कम किंवा, प्रकरणपरत्वे, शिल्लक रक्कम पाच हजार रुपयांपेक्षा अधिक होत नसेल, तर त्या बाबतीत, असा अधिकारी खंड (क) अन्वये प्रदेय नसेल तेव्हा ती रक्कम किंवा त्या रकमेचा असा कोणताही भाग घेण्यासाठी ज्या कोणत्याही व्यक्तीस निधीच्या नियमान्वये नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या व्यक्तीस ती रक्कम किंवा त्या भागाइतकी रक्कम देईल, किंवा, अशी कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित करण्यात आली नसेल तर, अशी रक्कम किंवा असा भाग मिळण्यास अन्यथा जी व्यक्ती हक्कदार आहे असे त्या अधिकाऱ्यास वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस देईल; अथवा

(ग) अशी कोणतीही रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा कोणताही भाग खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये प्रदेय नसेल त्या बाबतीत, असा अधिकारी, ती रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा कोणताही भाग,---

(एक) निधीच्या नियमांन्वये अशी रक्कम, अशी शिल्लक रक्कम किंवा असा भाग घेण्यास ज्या व्यक्तीस नामनिर्देशित केले असेल त्या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या इस्टेटीचा कारभार पाहण्याचे काम आपणाकडे देण्यात आले आहे या गोष्टीच्या पुराव्यादाखल मृत्युपत्र-प्रमाण किंवा प्रशासनपत्र सादर केल्यावर किंवा ज्या प्रमाणपत्रान्वये त्याच्या धारकास अशा रकमेचे, शिल्लक रकमेचे किंवा अशा भागाचे प्रदान स्वीकारण्याचा हक्क मिळतो असे [1]"उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९" (१८८९ चा ७.) अन्वयेचे किंवा सन १८२७ चा मुंबई विनियम आठ याअन्वयेचे प्रमाणपत्र सादर केल्यावर त्या नामनिर्देशित व्यक्तीस देईल, अथवा,

(दोन) अशा रीतीने कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित करण्यात आली नसेल तर अशा प्रसंगी, असे मृत्युपत्रप्रमाण, प्रशासनपत्र किंवा असे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या कोणाही व्यक्तीला देईल :

परंतु, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेल्या कोणत्याही रकमेपैकी संपूर्ण रक्कम किंवा तीपैकी काही रक्कम या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अन्य कोणत्याही व्यक्तीकडे अभिहस्तांकित करून देण्यात आली असेल, आणि त्या अभिहस्तांकनाची लेखी नोटीस अभिहस्तांकितीकडून अशा अधिकाऱ्यास मिळाली असेल तेव्हा, असा अधिकारी, या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेली वजात केल्यानंतर आणि खंड (क) अन्वये देय होणारी कोणतीही रक्कम वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या विधवा पत्नीस किंवा मुलांना किंवा त्यांच्या वतीने कोणाला तरी दिल्यानंतर,---

(एक) वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने, किंवा तो मयत असल्यास, असे कोणतेही विधिमान्य अभिहस्तांकन करण्यात आले नसते तर या पोटकलमान्वये ज्या व्यक्तीला अशी रक्कम किंवा शिल्लक देय झाली असती त्या व्यक्तीने आपली लेखी संमती दिली असेल तर, ती रक्कम किंवा तिचा भाग, प्रकरणपरत्वे, शिल्लक रक्कम, अभिहस्तांकितीस देईल, अथवा,---

(दोन) अशा प्रकारे संमती देण्यात आली नाही तर त्याबाबतीत, अशी रक्कम स्वीकारण्याचा हक्क कोणत्या व्यक्तीला आहे त्यासंबंधी सक्षम दिवाणी न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत त्या रकमेचे, तिच्या त्या भागाचे किंवा, प्रकरणपरत्वे, त्या शिल्लक रकमेचे प्रदान रोखून धरील.

१. आता पहा "भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५" (१९२५ चा अधिनियम ३९).

(२) पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही रक्कम देण्यात आल्यावर, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेपैकी जितकी रक्कम अशा रीतीने देण्यात आली असेल तितक्या रकमेच्या संबंधातील सर्व दायित्वातून शासनाची किंवा प्रकरणपरत्वे, रेल्वे प्रशासनाची संपूर्णपणे मुक्तता होईल.

नामनिर्देशित व्यक्तीचे हक्क.

५. [१][ (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात, अथवा शासकीय किंवा रेल्वे भविष्य निधीच्या वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने निधीत आपल्या खाती जमा असलेल्या रकमेची किंवा तिच्या भागाची मृत्युपत्रानुसार किंवा अन्यथा केलेल्या कोणत्याही विनियोग-व्यवस्थेत काहीही असले तरी, अशी रक्कम प्रदेय होण्यापूर्वी, किंवा प्रदेय झाली तरी ती देण्यात येण्यापूर्वी त्या वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा मृत्यू घडून आल्यास ती संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग घेण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीस बहाल करण्यात आला असल्याचे जेव्हा अशा निधीच्या नियमांन्वये यथोचित रीत्या केलेल्या कोणत्याही नाम-निर्देशनावरून दिसून येईल तेव्हा, वर सांगितल्याप्रमाणे अशा वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा मृत्यू घडून आल्यावर, उक्त व्यक्तीस इतर सर्व व्यक्तींना वगळून, प्रकरणपरत्वे, अशी रक्कम किंवा तिचा कोणताही भाग मिळण्याचा हक्क प्राप्त होईल. मात्र,—

(क) असे नामनिर्देशन कोणत्याही वेळी त्याच रीतीने केलेल्या अन्य नामनिर्देशनाद्वारे बदलण्यात आले नसावे किंवा त्या नियमान्वये विहित केलेल्या रीतीने व विहित केलेल्या प्राधिकाऱ्यास नोटीस देऊन ते स्पष्टपणे रद्द केले नसावे, अथवा

(ख) असे नामनिर्देशन त्यात विनिर्दिष्ट केलेली एखादी घटना घडून आल्यामुळे कोणत्याही वेळी विधिबाह्य झाले नसावे, आणि—

उक्त व्यक्ती अशा वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्यूपूर्वीच मरण पावली असेल तर, असे नामनिर्देशन उक्त व्यक्तीस बहाल करण्यात आलेल्या हक्काशी संबंधित असेल तेथवर ते नामनिर्देशन निरर्थक ठरेल व निष्परिणामक होईल :

परंतु, अशाप्रकारे मरण पावलेल्या व्यक्तीऐवजी दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस असा हक्क बहाल करण्या-विषयी त्या नामनिर्देशनात निधीच्या नियमांनुसार यथोचित रीत्या तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, वर सांगितल्याप्रमाणे उक्त व्यक्तीचा मृत्यू घडून आल्यावर तो हक्क त्या दुसऱ्या व्यक्तीकडे जाईल.]

(२) [२][ "भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ "] किंवा सन १८२७ चा मुंबई विनियम आठ यात काहीही असले तरीही, [३][ज्या व्यक्तीस वर सांगितल्याप्रमाणे हक्क प्राप्त झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, तिला अशी रक्कम किंवा तिचा भाग घेण्याचा हक्क देणारे एक प्रमाणपत्र त्या अधिनियमान्वये किंवा, प्रकरणपरत्वे, त्या विनियमान्वये देण्यात येईल] आणि मयत व्यक्तीच्या मालमत्तेच्या संबंधात अन्य कोणत्याही व्यक्तीस मृत्युपत्राप्रमाणे किंवा प्रशासनपत्र देण्यात आल्यामुळे असे प्रमाणपत्र विधिबाह्य ठरल्याचे किंवा ते अधिक्रांत झाल्याचे मानले जाणार नाही. १९२५ चा ३९.

[४][ (३) "भविष्य निधि (सुधारणा) अधिनियम, १९४६ " याच्या कलम २, पोट-कलम (१) अन्वये विशोधित करण्यात आल्याप्रमाणे असलेले या कलमाचे उपबंध, त्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी करण्यात आलेल्या सर्व नामनिर्देशनांनासुद्धा लागू होतील : १९४६ चा ११.

परंतु, अशाप्रकारे विशोधित करण्यात आलेले या कलमाचे उपबंध हे, जेथे उक्त दिनांकापूर्वी कोणतीही रक्कम देण्यात आली असेल किंवा निधीच्या नियमांनुसार यथोचित रीत्या करण्यात आलेल्या कोणत्याही नामनिर्देशनानुसार त्या नियमान्वये प्रदेय होत असेल अशा कोणत्याही प्रकरणी बाधक ठरणार नाहीत.]

वजाती करण्याचा अधिकार.

६. जो अंशदायी भविष्य निधीच्या स्वरूपाचा आहे अशा कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य-निधीच्या कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम जेव्हा प्रदेय होईल तेव्हा, [५][निधीच्या नियमांमध्ये याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेला] प्राधिकारी तसा निदेश देईल तर, त्या रकमेतून,—

---

१. १९४६ चा अधिनियम ११, कलम २ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. १९५० चा अधिनियम ३५, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे, "उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९४६ चा अधिनियम ११, कलम २ द्वारे, "अशी कोणतीही व्यक्ती, वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा मृत्यू झाल्यावर, तिला अशी रक्कम किंवा तिचा भाग घेण्याचा हक्क देणारे एक प्रमाणपत्र त्या अधिनियमान्वये किंवा, प्रकरणपरत्वे, त्या विनियमान्वये दिले जाण्यास हक्कदार असेल " या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे या कलमाची भर घालण्यात आली.

५. १९२५ चा अधिनियम २८, कलम ३ द्वारे, " ज्याच्याकडून त्या निधीची स्थापना करण्यात आली असेल असा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) वर्गणीदार किंवा ठेवीदार यांच्यावर आलेल्या एखाद्या दायित्वामुळे [1][शासनास किंवा रेल्वे प्रशासनास] देय होणारी, परंतु कोणत्याही प्रकरणी वर्गणीदार किंवा ठेवीदार यांच्या खात्यात जमा करण्यात आलेल्या अंशदानाची आणि अशा अंशदानांवर प्रोद्‌भूत झालेल्या कोणत्याही व्याजाच्या किंवा वाढीच्या एकूण रकमेपेक्षा अधिक नव्हे इतकी रक्कम; अथवा

(ख) निधीच्या नियमांमध्ये या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही कारणांवरून वर्गणीदारास किंवा ठेवीदारास [2][त्याच्या नोकरीतून] बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा त्याच्या नोकरीस प्रारंभ झाल्यापासून पाच वर्षांच्या आत त्याने अशा नोकरीचा राजीनामा दिला असेल त्या बाबतीत, अशा कोणत्याही अंशदानाची, व्याजाची व वाढीची संपूर्ण रक्कम किंवा त्यांचा कोणताही भाग

कापून घेण्यात येईल व ती रक्कम [1][शासनास किंवा, प्रकरणपरत्वे, रेल्वे प्रशासनास] देण्यात येईल.

केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांनी आपल्या सेवानिवृत्तीनंतरच्या दोन वर्षांच्या आत पूर्वपरवानगीशिवाय वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारल्यास त्यांच्या बाबतीत शासकीय अंशदाने रोखून धरणे किंवा त्यांची वसुली करणे.

[3][६क. (१) संदर्भावरून अन्यथा अर्थ लावण्याची आवश्यकता नसेल तर, या कलमात,—

(क) "केंद्र सरकारचा अधिकारी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, केंद्र सरकारने प्रस्थापित केलेल्या एखाद्या अंशदायी भविष्यनिधीचा वर्गणीदार किंवा ठेवीदार असून जो आपल्या सेवानिवृत्तीच्या निकटपूर्वी केंद्रीय सेवा-वर्ग एकमधील सेवेत असेल तो अधिकारी असा आहे, परंतु त्या शब्दप्रयोगात सेवेच्या संबंधातील एखाद्या करारान्वये एखाद्या विनिर्दिष्ट कालावधीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होत नाही;

(ख) "वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, व्यापारी, वाणिज्यिक, औद्योगिक, वित्तीय किंवा व्यवसायिक स्वरूपाचा धंदा करणाऱ्या कोणत्याही कंपनीत, सहकारी संस्थेत, भागीदारी संस्थेत किंवा अशा कोणत्याही व्यक्तीच्या हाताखाली कोणत्याही नात्याने (अभिकर्ता म्हणूनसुद्धा) असलेली नोकरी असा असून, त्या शब्दप्रयोगात पुढील गोष्टींचाही समावेश होतो :—

(एक) एखाद्या कंपनीचे संचालकपद;

(दोन) एखाद्या सहकारी संस्थेतील निवडणुकीद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे भरण्यात येणारे अध्यक्ष, सभापती, व्यवस्थापक, चिटणीस, खजिनदार यांच्या पदासारखे कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे कोणतेही पद
धारण करणे; आणि

(तीन) ज्या बाबींच्या संबंधात सुरू करावयाच्या एखाद्या व्यवसायाच्या बाबतीत जर,—

(क) केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याकडे व्यावसायिक स्वरूपाची अर्हता नसेल आणि ज्या बाबींच्या संबंधात असा व्यवसाय सुरू करावयाचा आहे किंवा चालवण्यात येत आहे त्या बाबींचा, त्यास आपल्या पदपरत्वे मिळालेल्या ज्ञानाशी किंवा अनुभवाशी संबंध जोडता येण्याजोगा असेल, अथवा

(ख) केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याकडे व्यावसायिक स्वरूपाची अर्हता असेल, परंतु ज्या बाबींच्या संबंधात असा व्यवसाय सुरू करावयाचा आहे त्या बाबी, त्याने केंद्र सरकारच्या अखत्याराखालील पदे धारण केलेली असल्याने, जेणेकरून त्याच्या अशिलांना गैरवाजवी फायदा मिळण्याचा संभव निर्माण होईल अशा स्वरूपाच्या असतील, अथवा

(ग) केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यास, ज्यामध्ये केंद्र सरकारच्या कार्यालयांशी किंवा अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे किंवा संबंध ठेवणे अगत्याचे आहे असे काम करावे लागत असेल तर,

त्या बाबींच्या संबंधात स्वतंत्रपणे अथवा एखाद्या भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणून किंवा सल्लागार किंवा संमंत्रक या नात्याने व्यवसाय सुरू करणे :

परंतु, त्या शब्दप्रयोगात संपूर्णतः किंवा सारतः शासनाची मालकी किंवा नियंत्रण असलेल्या एखाद्या निगमातील किंवा कंपनीतील किंवा त्याखालील नोकरीचा किंवा शासनाकडून संपूर्णतः किंवा सारतः नियंत्रित करण्यात किंवा वित्तव्यवस्था करण्यात येणाऱ्या एखाद्या संस्थेतील किंवा तिच्या अखत्याराखालील नोकरीचा समावेश होत नाही;

---

१. १९२५ चा अधिनियम २८, कलम ३ द्वारे, "त्या प्राधिकाऱ्याला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, "त्या प्राधिकाऱ्यांच्या नोकरीतून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९७५ चा अधिनियम ४६, कलम २ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (दिनांक ७ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).

(ग) "शासकीय अंशदाने" या शब्दप्रयोगाचा अर्थ, केंद्र सरकारने किंवा एखाद्या राज्य शासनाने किंवा "स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४" याच्या अर्थानुसार असलेल्या एखाद्या स्थानिक प्राधिकरणाने "भविष्य निधि (विशोधन) अधिनियम, १९७५" याच्या प्रारंभानंतर, अशा प्रारंभानंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी दिलेली अंशदाने असा आहे; १९१४ चा ९. १९७५ चा ४६.

(घ) "विहित केलेले" या शब्दप्रयोगाचा अर्थ, केंद्र सरकारकडून शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेअन्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले असा आहे.

(२) केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आपल्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांची मुदत संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी केंद्र सरकारची आगाऊ परवानगी न घेता, वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारला तर अशा कोणत्याही बाबतीत, त्यास अंशदायी भविष्य निधीत त्याच्या खाती जमा करण्यात आलेल्या शासकीय अंशदानावर कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.

**स्पष्टीकरण १.**—केंद्र सरकारच्या ज्या अधिकाऱ्यास, त्याच्या सेवानिवृत्तीनंतर सेवेत कोणत्याही प्रकारे खंड पडू न देता त्याच पदावर किंवा केंद्र सरकारच्या अखत्याराखालील अन्य कोणत्याही वर्ग एकच्या पदावर किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अखत्याराखालील अन्य कोणत्याही समतुल्य पदावर पुन्हा नियुक्त करण्यात आले आहे त्या अधिकाऱ्याच्या संबंधात या पोटकलमाच्या आणि पोटकलम (७) च्या प्रयोजनार्थ "सेवानिवृत्तीचा दिनांक" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या दिनांकास अशा केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यांची सेवेतील पुर्ननियुक्ती होणे कायमचे बंद होईल तो दिनांक असा असेल.

**स्पष्टीकरण २.**—केंद्र सरकारच्या एखाद्या अधिकाऱ्यास, त्याच्या निवृत्तीपूर्व रजेच्या कालावधीत एखादा विशिष्ट वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारण्यासाठी केंद्र सरकारकडून परवानगी देण्यात आली असेल तर, अशा अधिकाऱ्याने सेवानिवृत्तीनंतर असा कामधंदा चालू ठेवण्यासाठी त्याने केंद्र सरकारची आगाऊ परवानगी मिळवलेली आहे असे या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, मानले जाईल.

(३) केंद्र सरकारच्या एखाद्या अधिकाऱ्याने विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये अर्ज केल्यावर पोटकलम (४) च्या उपबंधाच्या अधीनतेने केंद्र सरकार लेखी आदेशाद्वारे त्या अधिकाऱ्यास अशा अर्जात विनिर्दिष्ट केलेला वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारण्याची परवानगी त्यास ज्या कोणत्याही शर्ती घालून देणे आवश्यक वाटेल त्या शर्तींवर देऊ शकेल, किंवा अशा आदेशात कारणे लेखी नमूद करून अशी परवानगी नाकारू शकेल.

(४) एखाद्या केंद्र सरकारच्या अधिकाऱ्यास कोणताही वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारण्यासाठी या कलमान्वये परवानगी देताना किंवा नाकारताना केंद्र सरकार पुढील गोष्टी विचारात घेईल, त्या अशा :—

(क) त्याने स्वीकारण्याचे योजलेल्या कामधंद्याचे स्वरूप आणि नियोक्त्याचे पूर्ववृत्त;

(ख) त्याने जो कामधंदा स्वीकारण्याचे योजले आहे, त्या कामधंद्याच्या संबंधातील त्याची कर्तव्ये ही, ज्यामुळे त्याचा शासनाशी संघर्ष होईल अशा स्वरूपाची आहेत किंवा कसे;

(ग) अशा अधिकाऱ्याने ज्या नियोक्त्याच्या अखत्याराखाली कामधंदा करण्याचे योजिले आहे त्या नियोक्त्याशी त्याने नोकरीत असताना असा कोणताही व्यवहार केला होता काय की, जेणेकरून अशा अधिकाऱ्याने त्या नियोक्त्यावर मेहेरनजर केली असावी असा संशय येण्याइतपत वाजवी आधार मिळू शकेल ;

(घ) विहित करण्यात येतील अशा कोणत्याही अन्य संबद्ध गोष्टी.

(५) पोटकलम (३) अन्वये केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीच्या आंत केंद्र सरकारने त्या अर्जान्वये मागण्यात आलेली परवानगी देण्यास नकार दिला नाही किंवा असा नकार दिल्याचे अर्जदारास कळविले नाही तर अशा प्रकरणी, अशा अर्जात मागितलेली परवानगी केंद्र सरकारने दिलेली आहे असे मानण्यात येईल.

(६) जेव्हा केंद्र सरकारने अशा अर्जाअन्वये मागण्यात आलेली परवानगी कोणत्याही शर्तीवर दिली असेल किंवा अशी परवानगी नाकारली असेल तेव्हा, अशा अर्थाचा केंद्र सरकारचा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अर्जदारास, अशा कोणत्याही शर्तीविरुद्ध किंवा नकाराविरूद्ध अभिवेदन करता येईल आणि केंद्र सरकार त्यावर आपणास योग्य वाटतील असे आदेश देऊ शकेल :

परंतु, अशी शर्त रद्द करणारा किंवा कोणत्याही शर्ती न घालता अशी परवानगी देणारा आदेश खेरीजकरून, जो कोणताही अन्य आदेश काढण्याचे योजिले असेल त्या आदेशाविरुद्ध कारण दाखविण्याची संधी असे अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीस दिल्यावाचून असा कोणताही आदेश या पोटकलमान्वये काढण्यात येणार नाही.

(७) केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आपल्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांची मुदत संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, केंद्र सरकारची आगाऊ परवानगी न घेता, कोणताही वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारला असेल, किंवा ज्या शर्तीवर त्यास या कलमान्वये कोणताही वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा स्वीकारण्यास परवानगी दिली होती अशा कोणत्याही शर्तीचा त्याने भंग केला असेल तर अशा प्रकरणी, लेखी आदेशाद्वारे आणि त्यात नमूद केलेल्या कारणास्तव, केंद्र सरकारने त्या

अधिकाऱ्याच्या संबंधात भरण्यात आलेल्या शासकीय अंशदानाच्या रकमेचा जेवढा भाग अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या भागाइतक्या रकमेवर अशा अधिकाऱ्याचा हक्क असणार नाही असे घोषित करणे आणि त्यास अशी रक्कम मिळालेली असेल तर, त्याने शासकीय अंशदानाच्या तेवढ्या भागाइतकी रक्कम केंद्र सरकारास परत करावी असा निदेश देणे हे कायदेशीर असेल :

परंतु, अशा घोषणेविरुद्ध किंवा निदेशाविरुद्ध कारण दाखविण्याची संबंधित अधिकाऱ्यास संधी दिल्यावाचून असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, या पोटकलमान्वये असा कोणताही आदेश काढताना, केंद्र सरकार पुढील गोष्टी विचारात घेईल, त्या अशा :—

(एक) संबंधित अधिकाऱ्याची आर्थिक परिस्थिती ;

(दोन) संबंधित अधिकाऱ्याने स्वीकारलेल्या वाणिज्यिक स्वरूपाच्या कामधंद्याचे स्वरूप आणि अशा कामधंद्यापासून मिळणारे परिलाभ ;

(तीन) विहित करण्यात येतील अशा अन्य संबद्ध गोष्टी.

(८) पोटकलम (७) अन्वये काढलेल्या आदेशानुसार जी रक्कम परत करणे आवश्यक असेल अशी, कोणतीही रक्कम विहित केलेल्या मुदतीत परत करण्यात आली नाही तर, ती रक्कम जमीन-महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(९) या कलमान्वये केंद्र सरकारने काढलेला प्रत्येक आदेश संबंधित अधिकाऱ्यास कळवण्यात येईल.

(१०) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधात किंवा कोणत्याही अंशदायी भविष्य निधीस लागू असणाऱ्या नियमांत एतद्‌विरुद्ध काहीही असले तरीही या कलमाचे उपबंध परिणामक्षम होतील.

(११) या कलमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनाने किंवा लागोपाठची दोन किंवा अधिक अधिवेशने मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या मुदतीपर्यंत संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, तर तो अशा सुधारलेल्या अवस्थेतच केवळ अंमलात येईल किंवा प्रकरणपरत्वे तो मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असे कोणतेही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण.**

७. या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कारवाई चालणार नाही.

**इतर भविष्य निधींना हा अधिनियम लागू करण्याचा अधिकार.**

८. [1][(१)] [2][समुचित शासन] शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाचे उपबंध [3][(कलम ६क चे उपबंध खेरीजकरून)] हे "स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४" (१९१४ चा ९.) याच्या अर्थानुसार असलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही भविष्य निधीस लागू होतील ; आणि असे जाहीर करण्यात आल्यावर, जणू असा भविष्य निधी हा शासकीय भविष्य निधी असावा आणि असे स्थानिक प्राधिकरण हे शासन असावे त्याप्रमाणे हा अधिनियम लागू होईल.

[4][(२) या अधिनियमांचे उपबंध [3][(कलम ६क चे उपबंध खेरीजकरून)] हे, अनुसूचित विनिर्दिष्ट-केलेल्या संस्थांपैकी कोणत्याही संस्थतील कर्मचाऱ्यांच्या किंवा अशा संस्थांच्या कोणत्याही गटाच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही भविष्य निधीस लागू होतील असे [5][समुचित शासन] शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे निदेशित करू शकेल ; आणि असे जाहीर करण्यात आल्यावर, जणू असा भविष्य निधी हा शासकीय भविष्य निधी असावा आणि अशा निधीचा ताबा ज्या प्राधिकरणाकडे असेल ते प्राधिकरण हे शासन असावे त्याचप्रमाणे हा अधिनियम लागू होईल :

परंतु, कलम ६ मध्ये उल्लेखिलेल्या प्रमाणे अंशदाने देणारे प्राधिकरण जणू शासन असावे त्याप्रमाणे त्या कलमांचे उपबंध लागू होतील.

(३) [5][समुचित शासन], त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही सार्वजनिक संस्थेचे नाव शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनद्वारे अनुसूचित जादा दाखल करू शकेल, आणि अशी कोणतीही

---

१. १९३० चा अधिनियम १, कलम ३ द्वारे मूळ कलम ८ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. अनुकूलन आदेश १९३७ द्वारे, "स्थानिक शासन" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

३. १९७५ चा अधिनियम ४६, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (दिनांक ७ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).

४. १९३० चा अधिनियम १, कलम ३ द्वारे भर घातली.

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नोंद जादा दाखल करण्यात आल्यावर, जणू ती या अधिनियमाद्वारेच दाखल करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे ती अंमलात येईल.]

[1][(४) या कलमात "समुचित शासन" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(क) एखाद्या छावणी प्राधिकरणाच्या किंवा एखाद्या मोठ्या बंदरासाठी असलेल्या एखाद्या बंदर प्राधिकरणाच्या अथवा जी संस्था किंवा ज्या संस्थेची उद्दिष्टे [2][संविधानाच्या] सातव्या अनुसूचीतील १ ल्या सूचीमध्ये मोडतील असे केंद्र सरकारास वाटेल त्या संस्थेच्या संबंधात केंद्र सरकार, आणि

(ख) इतर बाबतीत, राज्य शासन,

असा आहे.

**स्पष्टीकरण.**—"सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०" या अन्वये नोंदविण्यात आलेल्या एखाद्या संस्थेच्या बाबतीत, "राज्य शासन" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या राज्यात अशी संस्था नोंदविण्यात आली असेल त्या राज्याचे राज्य शासन असा आहे.] १८६० चा अधिनियम २१.

**सैनिकांच्या इस्टेटींची व्यावृत्ती.** ९. ज्या कोणत्याही इस्टेटीचा कारभार चालवण्याच्या संबंधात "रेजिमेंटल डेट्स ॲक्ट, १८९३" (व्हिक्टो. सीएस ५६ व ५७) लागू होतो अशा कोणत्याही इस्टेटीच्या मालकीच्या पैशास कलम ४ किंवा कलम ५ यामधील कोणतेही उपबंध लागू होणार नाहीत.

१०. [निरसने.] "निरसन अधिनियम, १९२७" (१९२७ चा १२), कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

[3][अनुसूची

**संस्थांची सूची**

[कलम ८, पोटकलम (२) पहा]

१. दि पाश्चर इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, कसौली.
२. दि कलकत्ता इम्प्रूव्हमेंट ट्रिब्यूनल.
३. पाल्याधिकरण (कोर्ट ऑफ वॉर्ड्स)
४. दि इंडियन सेंट्रल कॉटन, कमिटी.
५. दि ट्रस्टीज फॉर दि युरोपियन हॉस्पिटल फॉर मेंटल डिसीजेस, रांची.
६. दि नॅशनल असोसिएशन फॉर सप्लाईंग फिमेल मेडिकल एड टू दि विमेन ऑफ इंडिया.
७. संविधीद्वारे स्थापन केलेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेले महाविद्यालय.]
[4][८. दि इंडियन कोल ग्रेडिंग बोर्ड.
९. दि लेडी मिंटोज इंडियन नर्सिंग असोसिएशन.
१०. इंडियन रेड क्रॉस सोसायटी.
११. दि इंडियन लॅक सेस कमिटी.
१२. इंडियन रेडक्रॉस सोसायटीची मद्रास राज्य शाखा.
१३. दि इंपिरिअल बँक ऑफ इंडिया.
१४. दि बिहार ॲण्ड ओरिसा मेडिकल एक्झामिनेशन बोर्ड.

[5]* * * * *

१६. "चहा जिल्हे उत्प्रवासी कामगार अधिनियम, १९३२" याखाली उत्प्रवासी कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आलेली संस्था.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे समाविष्ट केले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, "भारत शासन अधिनियम, १९३५" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९३० चा अधिनियम १, कलम ४ द्वारे १ ते ७ बाबींचा समावेश असणाऱ्या अनुसूचीची भर घालण्यात आली. मूळ अनुसूची सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १२, कलम २ व अनुसूचीद्वारे वगळण्यात आली.

४. बाब क्रमांक ७ नंतरच्या बाबींची अधिनियमाच्या कलम ८(३) खालील अधिसूचनांद्वारे वेळोवेळी भर घालण्यात आली.

५. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "१५. पंजाब युनिव्हर्सिटी" ही नोंद वगळण्यात आली.

१७. दि बॉम्बे बोर्ड ऑफ फिल्म सेन्सॉर्स.

१८. दि कलकत्ता युनिव्हर्सिटी.

१९. दि सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन.

२०. दि रिझर्व बँक ऑफ इंडिया.

[1]* * * * *

२२. दि बनारस हिन्दू युनिव्हर्सिटी.

२३. दि मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया.

२४. दि इंडियन कॉफी सेस कमिटी.

२५. दि इंटर-स्टेट बोर्ड फॉर अँग्लो-इंडियन अँड युरोपीयन एज्युकेशन.

२६. दि इंडियन रिसर्च फंड असोसिएशन.

२७. दि दिल्ली जॉइंट वॉटर अॅन्ड सिवेज बोर्ड.

२८. दि ट्युबरक्युलॉसिस असोसिएन ऑफ इंडिया.

२९. दि कोल माइन्स स्टोविंग बोर्ड.

३०. ए ग्रुप कमिटी ऑफ दि स्लीपर पूल ऑफ इंडियन रेल्वेज.

३१. दि इंडियन कॉफी मार्केट इक्स्पान्शन बोर्ड.

३२. दि कोल माइन्स रेस्क्यू स्टेशन्स कमिटी.

३३. दि इंडियन कॉफी बोर्ड.

[2]* * * * *

३५. दि इंडियन रबर बोर्ड.

३६. दि इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटी.

३७. दि ऑल इंडिया कॅटल शो कमिटी.

३८. दि कोल माइन्स लेबर वेलफेअर फंड.

३९. दि इंडियन कोकोनट कमिटी.

४०. दि इंडियन सैंट्रल टोबॅको कमिटी.

४१ दि एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन.

४२. दि इंडियन टी लायसेन्सिंग कमिटी.

४३. दि कोल माइन्स (कॉन्झर्वेशन अॅण्ड सेफ्टी) अॅक्ट, १९५२ खाली स्थापन झालेले कोल बोर्ड.

४४. दि देल्ही रोड ट्रान्सपोर्ट अॅथॉरिटी, न्यू देल्ही.

४५. दि सैंट्रल टी बोर्ड.

४६. दि इंडियन सैंट्रल ऑईलसीड्स कमिटी.

४७. दि सैंट्रल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च इन इंडिजिनस सिस्टिम्स ऑफ मेडिसिन, जामनगर.

४८. दि इंडियन स्टॅण्डर्ड्स् इन्स्टिटयूट, न्यू देल्ही.

४९. दि टेक्स्टाईल कमिटी.

५०. दि देशबन्धु कॉलेज, कालकाजी.

५१. दि दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन.

५२. दि सेंट्रल सिल्क बोर्ड.

५३. दि युनिव्हर्सिटी ग्रान्ट्स कमिशन, न्यू देल्ही.

५४. दि खादी अॅण्ड व्हिलेज इण्डस्ट्रीज कमिशन.

५५. दि लॉरेन्स स्कूल (सनबर) सोसायटी.

५६. दि कलावती शरण चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, न्यू देल्ही.

५७. दि श्री गुरु तेजबहादुर खालसा कॉलेज, न्यू देल्ही.

५८. दि टी बोर्ड.

५९. लेडी श्रीराम कॉलेज फॉर विमेन, न्यू देल्ही.

---

१. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे " २१. द ट्रस्टीज ऑफ द व्हिक्टोरिया मेमोरिअल पार्क, रंगून " ही नोंद वगळण्यात आली.

२. वरील आदेशाद्वारे " ३४. इंडियन क्रॉस सोसायटीची दि एन.डब्ल्यू.एफ. प्रॉव्हिन्शीयल ब्रँच " ही नोंद वगळण्यात आली.

६०. इन्डियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन, न्यू देल्ही.

६१. दि सेंट्रल बोर्ड फॉर वर्कर्स एज्युकेशन.

६२. दि ऑईल अॅण्ड नॅचरल गॅस कमिशन.

६३. दि स्कूल ऑफ प्लॅनिंग अॅण्ड आर्किटेक्चर, न्यू देल्ही.

६४. दि सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीज फॉर दि अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि प्रॉव्हिडंट फंड एस्टॅब्लिश्ड अंडर दि एम्लॉईज प्रॉव्हिडंट फंड स्कीम, १९५२.

६५. दि गुजरात स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन.

६६. उत्तर प्रदेश फायनान्शियल कॉर्पोरेशन एस्टॅब्लिश्ड (इनकॉर्पोरेटेड) अंडर दि स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन अॅक्ट, १९५१ (१९५१ चा ६३).

६७. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, बॉम्बे

६८. दि इंडियन नर्सिंग कौन्सिल.

६९. गुजरात स्टेट फायनान्शिल कॉर्पोरेशन इनकॉर्पोरेटेड अंडर दि स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन्स अॅक्ट १९५१ (१९५१ चा ६३).

७०. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मद्रास.

७१. राजस्थान फायनान्शियल कॉर्पोरेशन इनकॉर्पोरेटेड अंडर दि स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन्स अॅक्ट, १९५१ (१९५१ चा ६३).

७२. एअर इंडिया इंटरनॅशनल कॉर्पोरेशन.

७३. दि साहित्य अॅकॅडमी, न्यू देल्ही.

७४. दि पन्नालाल गिरधरलाल डी.ए.व्ही. कॉलेज, न्यू देल्ही.

७५. देल्ही स्कूल ऑफ सोशल वर्क, देल्ही.

७६. दि ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस.

७७. दि बोर्ड ऑफ ट्रस्टीज फॉर दि अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि प्रॉव्हिडंट फंड एस्टॅब्लिश्ड फंड अंडर दि कोल माइन्स प्रॉव्हिडंट फंड स्कीम, १९४८.

७८. जानकीदेवी महाविद्यालय, न्यू देल्ही.

७९. दि इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स, न्यू देल्ही.

८०. नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल.

८१. दि नॅशनल इण्डस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड.

८२. दि. पोस्ट-ग्रॅज्युएट ट्रेनिंग सेंटर इन आयुर्वेद, जामनगर.

८३. दि इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटर, न्यू देल्ही.

८४. दि इंडियन एअरलाईन्स कॉर्पोरेशन.

८५. दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर.

८६. दि विशाखापटनम डॉक लेबर बोर्ड एस्टॅब्लिश्ड् अंडर दि डॉक वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) अॅक्ट, १९४८ (१९४८ चा ९).

८७. दि सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्ड.

८८. ओरिसा स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन इन्कॉर्पोरेटेड अंडर दि स्टेट फायनान्शियल कार्पोरेशन्स अॅक्ट १९५१ (१९५१ चा ६३).

८९. दि संगीत नाटक अॅकॅडमी, न्यू देल्ही.

९०. इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ, न्यू देल्ही.

९१. दि देल्ही वक्फ बोर्ड.

९२. इन्स्टिटयूट ऑफ एम्प्लॉईज मॅनपॉवर रिसर्च, न्यू देल्ही.

९३. दि इंडियन लॉ इन्स्टिटयूट.

९४. दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, न्यू देल्ही.

९५. दयालसिंग कॉलेज, न्यू देल्ही.

९६. प्रमिला कॉलेज, न्यू देल्ही.

९७. सनातन धर्म कॉलेज, न्यू देल्ही.

९८. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया.

९९. दि सैनिक स्कूल्स सोसायटी.

१००. दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, कलकत्ता.

१०१. दि सालारजंग म्युझियम बोर्ड, हैद्राबाद.

१०२. दि ललित कला अॅकॅडमी, न्यू देल्ही.

१०३. मध्य प्रदेश फायनान्शियल कॉर्पोरेशन इनकॉर्पोरेटेड अंडर दि स्टेट फायनान्शियल कॉर्पोरेशन्स अॅक्ट, १९५१ (१९५१ चा ६३).

१०४. दि कोचीन डॉक लेबर बोर्ड एस्टॉब्लिश्ड् अंडर दि डॉक वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) अॅक्ट, १९४८ (१९४८ चा ९.)

१०५. दि सेंट्रल कौन्सिल ऑफ गोसंवर्धन.

१०६. दि स्टेट बँक ऑफ इंडिया कॉन्स्टिट्यूटेड बाय दि स्टेट बँक ऑफ इंडिया अॅक्ट, १९५५ (१९५५ चा २३.)

१०७. ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेंटल हेल्थ, बँगलोर.

१०८. दि इंडियन इन्स्टिटयूट ऑफ फॉरिन ट्रेड, न्यू देल्ही.

१०९. देल्ही लायब्ररी बोर्ड, न्यू देल्ही.

११०. दि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ अॅडमिनिस्ट्रेशन अॅण्ड एज्युकेशन, न्यू देल्ही.

१११. दि ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ स्पीच अॅण्ड हिअरिंग, म्हैसूर.

११२. दि इंडियन म्युझियम, कलकत्ता.

११३. प्रेस कॉन्सिल ऑफ इंडिया.

११४. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन, रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग.

११५. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन सोसायटी.

११६. दि नॅशनल इनिस्टटयूट फॉर ट्रेनिंग इन इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग, बॉम्बे.

११७. कोचीन पोर्ट ट्रस्ट.

११८. विशाखापट्टणम पोर्ट ट्रस्ट.

११९. कांडला पोर्ट ट्रस्ट.

१२०. मार्मागोवा पोर्ट ट्रस्ट.

१२१. परदीप पोर्ट ट्रस्ट.

१२२. नेहरू मेमोरिअल म्युझियम अॅण्ड लायब्ररी, न्यू देल्ही.

१२३. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, न्यू देल्ही.

१२४. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन कौन्सिल.

१२५. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन एजन्सी, बॉम्बे.

१२६. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन एजन्सी, देल्ही.

१२७. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन एजन्सी, कलकत्ता.

१२८. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन एजन्सी, मद्रास.

१२९. एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन एजन्सी, कोचीन.

१३०. दि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फाऊण्ड्री अॅण्ड फोर्ज टेक्नॉलॉजी, रांची.

१३१. दि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया एस्टॅब्लिश्ड अंडर दि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया अॅक्ट, १९६३ (१९६३ चा ५२).

१३२. दि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, न्यू देल्ही.

१३३. दि. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंट, बॉम्बे.

१३४. दि पोस्ट-ग्रॅज्युएट इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, चंदीगड.

१३५. दि कार्डामॉम बोर्ड एस्टॅब्लिश्ड अंडर दि कार्डामॉम अॅक्ट, (१९६५ चा ४२).

१३६. दि सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च अॅण्ड ट्रेनींग इन पब्लिक को-ऑपरेशन, न्यू देल्ही.

१३७. व्हिक्टोरिया मेमोरिअल हॉल, कलकत्ता.

१३८. दि मार्मागोवा अॅन्ड डॉक लेबर बोर्ड एस्टॅब्लिश्ड् अंडर दि डॉक वर्कर्स (रेग्युलेशन) अॅक्ट, १९४८ (१९४८ चा ९).

१३९. दि इन्स्टिटयूट ऑफ कॉन्स्टिटयूशनल अॅण्ड पार्लमेंटरी स्टडीज, न्यू देल्ही.

१४०. दि इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज अॅण्ड अॅनालिसिस, न्यू देल्ही.

१४१. सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च, न्यू देल्ही.

१४२. आयर्न ओअर बोर्ड.

१४३. कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, न्यू देल्ही.

१४४. इंडियन स्कूल ऑफ माइन्स, धनबाद.

१४५. सीमेन्स प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन.

१४६. रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन, लिमिटेड.

१४७. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ जीओमॅग्नेटिझम् बॉम्बे.

१४८. केंद्रीय विद्यालय संगठन.

१४९. बाल भवन सोसायटी (इंडिया).

१५०. पॉवर इंजिनिअर्स ट्रेनिंग सोसायटी.

१५१. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हायड्रोजन].

[1][१५२. रमण रीसर्च इन्स्टिटयूट, बॅंगलोर]

[2][१५३. दि राष्ट्रीय संस्कृत संस्थान, न्यू देल्ही]

[3][१५४. दि नॅशनल लेबर इन्स्टिटयूट]

[4][१५५. दि नॅशनल को ऑपरेटीव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, न्यू देल्ही.]

[5][१५३. दि नॅशनल वाटर डेव्हलपमेंट एजन्सी, न्यू देल्ही.]

---

१. दिनांक १७ नोव्हेंबर, १९८४ चे भारताचे राजपत्र भाग दोन, कलम ३ (दोन) मधील दिनांक २९ ऑक्टोबर, १९५४ चे स्थायी आदेश ३६४४ याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

२. दिनांक ४ जानेवारी, १९८६ चे भारताचे राजपत्र भाग दोन एस. ३(२) मधील दिनांक ४ डिसेंबर, १९८५ चे स्थायी आदेश क्रमांक ३६ याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

३. दिनांक १२ डिसेंबर, १९८७ चे भारताचे राजपत्र भाग दोन मधील दिनांक ३० नोव्हेंबर, १९८७ चे स्थायी आदेश क्रमांक ३४०१ याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

४. दिनांक ११ जानेवारी, १९८६ चे भारताचे राजपत्र भाग दोन, एस. ३(४) मधील दिनांक २७ डिसेंबर, १९८५ चे स्थायी आदेश क्रमांक १२९ याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

५. दिनांक १९ मार्च, १९८८ चे भारताचे राजपत्र भाग दोन, एस. ३ (दोन) मधील दिनांक १७ फेब्रुवारी, १९८८ चे स्थायी आदेश क्रमांक ६७६ याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

# THE PROVIDENT FUNDS ACT, 1925

# भविष्य निधि अधिनियम, १९२५

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| commercial employment | वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा .. | [ S. 6A (*b*) ] |
| compulsory deposit | सक्तीची ठेव .. .. | [ S. 2 (*a*) ] |
| contribution | अंशदान .. .. | [ S. 2 (*b*) ] |
| deceased | मृत .. .. | [ S. 2 (*c*) ] |
| dependant | अवलंबित .. .. | [ S. 2 (*c*) ] |
| deposit | ठेव .. .. | [ S. 2 (*a*) ] |
| nominees | नामनिर्देशित व्यक्ती .. | [ S. 5-M.N. ] |
| paternal grand-parent | वडिलांची आई-वा वडील .. | [ S. 2 (*c*) ] |
| Provident Fund | भविष्य निधि .. | [ S. 2 (*e*) ] |
| subscription | वर्गणी .. .. | [ S. 2 (*a*) ] |

# भविष्य निधि अधिनियम, १९२५

# THE PROVIDENT FUNDS ACT, 1925

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अवलंबित | dependant | .. [क. २(ग्)] |
| अंशदान | contribution | .. [क. २(ख्)] |
| ठेव | deposit | .. [क. २(क्)] |
| नामनिर्देशित व्यक्ती | nominees | .. [क. ५ स.टी.] |
| भविष्य निधि | provident fund | .. [क. २(ङ)] |
| मृत | deceased | .. [क. २(ग्)] |
| वर्गणी | subscription | .. [क. २(क्)] |
| वडिलांची आई-वा-वडील | paternal grant-parent | .. [क. २(ग्)] |
| वाणिज्यिक स्वरूपाचा कामधंदा | commercial employment | .. [क. ६क (ख्)] |
| सक्तीची ठेव | compulsory deposit | .. [क. २ (क्)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई